Shree Bharat Shikshan Prasark Mandal's

# Mauli Mahavidyalaya Wadala

**Internal Complaint Committee**

**Programme Report**

Academic Year – 2015-16

दि : **08/03/** 2016

अतंर्गत तक्रार निवारण समिती व समासशास्त्र विभागाच्या वतीने दिं 08/03/2016 जागतिक महिला दिना निमित्त पोस्टर प्रदर्शन व फनफेअर गेमचे आयोजन करण्यात आले होते. माऊली महिला पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ. वैशालीताई साठे ह्या या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून लाभलेल्या. अशा कार्य क्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांचा विकास होतो, त्यामुळे अशा कार्यक्रमाची विद्यार्थ्यांना गरज आहे असे सौ. साठे यांनी सांगीतले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. जी.एन. चिट्टे उपस्थित होते. त्याचप्रमाणे या कार्यक्रमाला ग्रंथपाल सौ. पाटील पी.एस. व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. या कार्य क्रमाचे प्रास्ताविक समितीचे समन्वयक प्रा. बिरादार पी.आर. यांनी केले. समितीचे सचिव प्रा. वाघचवरे बी.डी. यांनी आभार मानले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पाटील पी.जे. यांनी केले. विविध विषयावर विद्यार्थ्यांनी पोस्टर तयार केले. पाव खाणे, स्ट्रॉ रोवणे, फुगा फुगविणे इ. गेममध्ये बहूसंख्य विद्यार्थ्यीनींनी सहभाग घेतला होता. पाव या स्पर्धेत कुमारी दुधाळे तेजा ही प्रथम आली. केसात स्ट्रॉ रोवने या मध्ये कुमारी माया माने ही प्रथम आली. फुगा फुगविणे या मध्ये कु. अनुजा पाटील ही प्रथम आली. प्रथम आलेल्या विदयार्थीनीना पेन व फूल देऊन सत्कार करण्यात आला.





**Poster Presentation on Female Feticide & Funfair game**

Shree Bharat Shikshan Prasark Mandal's

# Mauli Mahavidyalaya Wadala

**Internal Complaint Committee**

**Programme Report**

Academic Year – 2015-16

दिं : **05/01/**2016

महाविद्यालयातील अतंर्गत महिला तक्रार निवारण समितीच्या वतीने दि. ०५/०१/२०१६ रोजी सकाळी १०.३० वा. सभागृहामध्ये ग्रामीण पोलीस उपनिरीक्षक सोलापूर मा. अमृता पटाईत यांचे 'कायदयात्मक तरतुदी व संरक्षण' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. युवतीने स्वसंरक्षण कसे करावे? याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच मा. डी. एस पवार पोलिस निरीक्षक सोलापूर यांनीही स्वसंरक्षणासंदर्भात मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून सोलापूर जिल्हा परिषेदेचे माजी अध्यक्ष मा. बळीराम काका साठे उपस्थित होते. त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. एन. चिट्टे उपस्थित होते. समितीचे समन्वयक प्रा. बिरादार पी.आर. यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रा. वाघचवरे बी.डी. यांनी आभार मानले, प्रा. घोरपडे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. या कार्य क्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते. त्याच बरोबर महाविद्यालयातील बहूसंख्य विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते.





**Lecture on legal guidance and Self-defence**

Shree Bharat Shikshan Prasark Mandal's

# Mauli Mahavidyalaya Wadala

**Internal Complaint Committee**

**Programme Report**

Academic Year – 2016-17

दिं : **28/07/२०१६**

महाविद्यालयातील अतंर्गत महिला तक्रार निवारण समिती यांच्या वतीने दि. २८/०७/२०१६ रोजी सकाळी १०.३० वा. सभाग्रहामध्ये मा. रामकृष्ण भोसले पोलीस निरिक्षक तालुका पोलीस स्टेशन सोलापूर यांचे दामिनी पथकाचे कार्ये या विषयावर मार्गदर्शन पर कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून सोलापूर जिल्हा परिषदेचे नुतन सदस्य मा. काका साहेब साठे उपस्थित होते. त्याच प्रमाणे न्यू हायस्कूलचे प्राचार्य मा. सुधीर पवार, माऊली महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. एन. चिट्टे उपस्थित होते. दामिनी पथकाचे कार्ये, उद्देश, त्यामधील तरतुदी याविषयी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या कार्य क्रमाचे प्रास्ताविक समिती समन्वयक प्रा. बिरादार पी.आर. यांनी केले. प्रा. वाघचवरे बी.डी. यांनी केले. या कार्यक्रमाला भारत शिक्षण प्रसारक मंडळातील सर्व शिक्षक महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते. त्याचबरोबर बहूसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.











## 'महिलांच्या संरक्षणासाठी सर्वांनी पुढे येण्याची गरज'

उत्तर सोलापूर / तालुका प्रतिनिधी

महिला, मुली यांचा कायम आदर करुन त्यांना सन्मानपुर्वक वागणूक देणे ही आपली संस्कृती असून त्यांचे रक्षण करण्यासाठी सर्वांनी पुढे आले पाहिजे असे मत सोलापूर जिल्हा परिषेदेचे माजी अध्यक्ष बळीराम साठे यांनी व्यक्त केले.

माऊली महाविद्यालय वडाळा ता.उ.सोलापूर या महाविद्यालयातील महिला तक्रार निवारण समितीच्या वतीने आयोजित केलेल्या महिलांसमोरील अडचणी व समस्या या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रमात साठे बोलत होते. या कार्यक्रमास प्रमूख पाहुणे म्हणून सोलापूर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण भोसले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.एन. चिट्टे, प्राचार्य सुधीर पवार उपस्थित होते.

यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक भोसले म्हणाले की, मुलींना जर कोणी जाणून - बुजून त्रास देत असेल तर अशांवर कडक कारवाई करण्यात येईल. मुलींनी स्वसंरक्षणासाठी धाडसाने पुढे येण्याची गरज असून मुलींना कोणी त्रास देत असेल तर कुठल्याही दबावाला बळी न पडता तातडीने पोलिसांना संपर्क करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमास पर्यवेक्षक सी. एम. साठे, प्रा.प्रताप पाटील, सतिश नागणे, शंकर खळसोडे, सतिश घोरपडे यांच्यासह भारत शिक्षण प्रसारक मंडळाच्या संकुलातील सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पी.आर. बिरादार यांनी केले तर आभार प्रा. पी. जे. पाटील यांनी मानले.

वडाळा येथे महिला तक्रार निवारण समितीच्या कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थीनी.

**Police Inspector Ram Kishan Bhosale gave guidance on the work of Damini squad**

Shree Bharat Shikshan Prasark Mandal's

# Mauli Mahavidyalaya Wadala

## Internal Complaint Committee

## Workshop Report

Academic Year – 2016-17

Date: **27/02/2017**

दि. 27.02.2017 रोजी महाराष्ट्र राज्य महिला आयोग मुंबई व सोलापूर विदयापाठ सोलापूर आणि अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती माऊली महाविदयालय, वडाळा यांच्या संयुक्त विदयमाने कामाच्या ठिकाणी महिलांचे लैगिंक छळापासून संरक्षण प्रतिबंध मनाई आणि निवारण अधिनियम 2013 च्या जगृती संदर्भात महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. जी.एन. चिट्टे मार्गदर्शनाखाली एकदिवशीय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेचे उदघाटक म्हणून सोलापूरबार असोशिएशन सोलापूर चे अध्यक्ष मा.डॉ.एल.एन.मारडकर,कार्यशाळेचे अध्यक्ष सोलापूर जि.प नुतन सदस्य व माजी अध्यक्ष मा.बळीराम काका साठे प्रमुख उपस्थीतीमध्ये सोलापूर बार आसोशिएनचे उपाध्यक्ष मा.ॲड.बाबासाहेब जाधव संस्थेचे चेअरमन मा. जितेंद्र बाबा साठे, माऊली महिला पतसंस्था वडाळा अध्यक्ष डॉ. वैशालीताई साठे महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. जी. एन. चिट्टें व महाविदयालयातील सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होता यामध्ये जवळपास 250 विदयार्थी सहभागी होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. प्रमोद पाटील यांनी केले तर अभार प्रा.परमेश्वर हटकर यांनी मानले.









महिला संरक्षण | वडाळा येथील माऊली महाविद्यालयात मारडकर यांचे मत

**गुन्हेगारी प्रवृत्ती वाढल्यामुळेच नव्या कठोर कायद्याची अंमलबजावणी हवी**

प्रतिनिधी । उत्तर सोलापूर

समाजात वावरताना आपण आपले वर्तन चांगले ठेवले तर कायद्याची अंमलबजावणी करण्याची गरज भासणार नाही. परंतु आजच्या काळात एकमेकांविषयी असणारी आदराची भावना लोप पावत चालली आहे. गुन्हेगारी प्रवृत्ती वाढल्यामुळेच सरकारला नवीन कठोर कायदे अमलात आणण्याची गरज आहे, असे मत सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. एल. एन. मारडकर यांनी व्यक्त केले.

वडाळा (ता. उ. सोलापूर) येथील माऊली महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य महिला आयोग (मुंबई), सोलापूर विद्यापीठ व माऊली महाविद्यालयाच्या वतीने कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध मनाई आणि निवारण अधिनियम २०१३) कायद्याच्या अंमलबजावणी बाबत एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बळीराम साठे उपस्थित होते. व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र साठे बार असोसिएशनचे उपाध्यक्ष ॲड.बाबासाहेब जाधव, डॉ .वैशाली साठे प्रा.सौ.प्रतिभा बिरादार, प्रा बाळासाहेब वाघचवरे उपस्थित होते.

यावेळी डॉ.वैशाली साठे यांनीही विद्यार्थीना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रा.विजय म्हमाणे, प्रा.बालाजी गरड, प्रा.बालाजी गंगावणे प्रा.विकास शिंदे, प्रा. सुवर्णा गुंड, प्रा. शेषनारायण देशमुख, प्रा. प्रतिभा पाटील, प्रा. प्रमोद पाटील, राजाभाऊ साठे, रमेश सुतार, मनोज साठे उपस्थित होते. प्रास्तविक महाविद्यालयातील महिला तक्रार निवारण समितीच्या सचिव प्रा. प्रतिभा बिरादार यांनी करून कार्यशाळा घेण्यामागची भूमिका विषद केली. सूत्रसंचालन प्रा. प्रमोद पाटील यांनी केले. आभार प्रा. परमेश्वर हटकर यांनी मानले.

वडाळा येथील कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ॲड. एल. एन. मारडकर.

महिलांनी आज स्वतःच्या कर्तृत्वावर सर्व क्षेत्रात यश संपादन केले आहे. शिक्षण क्षेत्रात गुणवत्तेत तर आज मुलींचा अग्रक्रम असून, आज केंद्र व राज्य सेवेत महिला पुढे आहेत. पूर्वी महिला चूल आणि मूल एवढ्यातच गुंतून राहिली होती. परंतु जगाच्या पाठीवर शिक्षणाच्या जोरावर महिलांनी स्वतःचे अस्तित्व निर्माण केले आहे. स्त्रियांचा कायम आदर केला पाहिजे. त्यांचा मानसन्मान ठेवला पाहिजे, ही भारतीय संस्कृती आहे. त्यामुळे महिलांचा मानसिक शारीरिक छळ करणाऱ्या प्रवृत्तीला ठेचून काढले पाहिजे. त्यामुळे आता महिलांनी कोणत्याही परिस्थितीत अन्याय अत्याचार सहन न करता वाईट प्रवृत्ती संपवावी. आपल्या पाठीशी कायदे आहेत. त्याचा वापर संबंधित घटकांनी केला पाहिजे.
बळीराम साठे, वडाळा, ता. उत्तर सोलापूर

## Workshop on Sexual harassment at work place (Prevention, Prohibition & Redressal) Act-2013

Shree Bharat Shikshan Prasark Mandal's

# Mauli Mahavidyalaya Wadala

**Internal Complaint Committee**

**Programme Report**

Academic Year – 2017-18

Date: 09/08/2017

अतंर्गत  तक्रार निवारण समिती व विद्यार्थीनी समुपदेशन समिती माऊली महाविद्यालय वडाळा, दि. ०९/०८/२०१७ रोजी सकाळी १०.३० वा. डॉ. रूपाली कुलकर्णी मॅडम यांचे 'आहार व आरोग्य' या विषयावर व्याख्यान घेण्यात आले. हा कार्यक्रम रुम नं 8 मध्ये घेंण्यात आला  महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आहाराची सकसता किती महत्वाची आहे? सदृढ आरोग्यासाठी काय करावे. यावर डॉ. कुलकर्णी मॅडम यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागप्रमुख आदरणीय शिंदे. व्ही. व्ही. हे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समितीचे समन्वयक प्रा. बिरादार पी.आर. यांनी केले. समितीचे सचिव प्रा. वाघचवरे बी.डी. यांनी आभार मानले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. दुधाळे तेजा या विद्यार्थी नीनी केले. जवळपास महाविदयालयातील बहूसंख्य विदयार्थ्यानी  या कार्यक्रमाचा लाभ घेतला.





**Lecture on Diet and Health**

Shree Bharat Shikshan Prasark Mandal’s

# Mauli Mahavidyalaya Wadala

**Internal Complaint Committee**

**Raising Day**

**Programme Report**

Academic Year – 2018-19

दिं : **07/01/**2019

महाविद्यालयातील महिला तक्रार निवारण समिती व राष्ट्रीय सेवा योजना या विभागाच्या वतीने दि. ०७/०१/२०१९ रोजी महाविद्यालयातील ३० विद्यार्थ्यांना घेवून ग्रामीण पोलिस स्टेशन सोलापूर या ठिकाणी भेट देण्यात आली. पोलिस स्टेशन मधील कार्यक्रम व उपक्रम या संदर्भात त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.




**Visit to Taluka Police Station Solapur**

Shree Bharat Shikshan Prasark Mandal's

# Mauli Mahavidyalaya Wadala

**Internal Complaint Committee**

**Programme Report**

Academic Year – 2018-19

दि.17.01.2019

महिला तक्रार निवारण समितीच्या वतीने दि.17.01.2019 रोजी सकाळी ठिक 10.30 वाजता सभाग्रहामध्ये ॲड.नीता सूरेशबाबू मंकणी यांचे 'समितीचे कामकाज व कैटूंबिक हिंसाचाराचा कायदा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.एन.चिट्टे उपस्थित होते. प्रतिमा पूजन व दिप प्रज्वलन करुन कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. कू. मृणाली लूंगसे, कु. राधा ताटे कु.जमदाडे या विद्यार्थीनींनी स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समिती समन्वयक डॉ. बिरादार प्रतिभा यांनी केले. कू.प्रगती जावळे या विद्यार्थीनींनी प्रमूख पाहूण्याचा परिचय करुन दिला. या कार्यक्रमाचे आभार प्रा. वाघचवरे बी.डी. मानले. या कार्यक्रमाला बी.ए.व बी.एस्सीचे विद्यार्थी,प्राध्यापक,कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.





## सामंजस्यपणा ठेवल्यास कौटुंबिक कलह संपतील : ॲड. मंकणी

वडाळा / प्रतिनिधी

आजकाल कोणतेही नाते हे होणाऱ्या गैरसमजातून संपुष्टात येत असून समाजातील अनेक कुटुंबातील कौटुंबिक वाद हे नात्यातला सामंजस्यपणा कमी झाल्याने होत असून आपल्यातला संस्कृतपणा हाच आपण किती सुशिक्षित आहोत, याचा आरसा आहे, असे मत सोलापूर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्य ॲड.नीता मंकणी यांनी व्यक्त केले.

वडाळा (ता.उ.सोलापूर) येथील माऊली महाविद्यालयात अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीच्यावतीने आयोजित 'कौटुंबिक हिंसाचार कायदेविषयक जागृती' या विषयावर त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.एन. चिट्टे हे होते. यावेळी व्यासपीठावर समितीच्या सचिव प्रा.डॉ. प्रतिभा बिरादार, प्रा.बाळासाहेब वाघचवरे, प्रा.शितल अलगुंडे उपस्थित होते.

यावेळी बोलताना त्या पुढे म्हणाल्या की, महिलांच्या संरक्षणासाठी अनेक कठोर कायदे झालेले आहेत. ग्रामीण भागातील महिलांना याबाबत जनजागरण झाले पाहीजे, आपल्यावर होत असलेल्या अन्यायाविरुध्द कायदेशीर मार्गाने आवाज उठविणे गरजेचे आहे. परंतू कुटुंबातील एकाधिकारशाहीची मानसिकता बदलली तर अनेक वादविवाद कमी होतील. आजकाल उच्चशिक्षित लोकच सुशिक्षितपणाचा आव आणत सून, सासू, पती, पत्नी, आईवडील, मुले, मुली या नात्यात कटूता आणत आहेत. यासाठी आपल्याला संस्कारक्षम शिक्षणाची गरज असून असे शिक्षण घेऊनच आपण पुढे यावे असेही त्या म्हणाल्या. यावेळी कार्यक्रमासाठी प्रा.बालाजी गंगावणे, प्रा.परमेश्वर हटकर, प्रा. डॉ.परमेश्वर सूर्यवंशी, प्रा.डॉ.सतिश घोरपडे, प्रा.डॉ. बालाजी गरड, प्रा.डॉ.सुवर्णा गुंड, प्रा.डॉ.दत्तात्रय हरवाळकर, प्रा.शेषनारायण देशमुख, प्रा.विकास शिंदे, प्रा.प्रतिभा पाटील, प्रा.डॉ.विजय म्हमाणे, प्रा.बाजीराव गुंड, प्रा. रामदास वरवटकर, प्रा.डॉ.मदगोंडा, वराडे, प्रा.मोटे उपस्थित होते. प्रास्तविक प्रा.डॉ.प्रतिभा बिरादार यांनी केले. सुत्रसंचालन प्रा.प्रमोद पाटील यांनी केले तर आभार प्रा.प्रज्ञा वाडकर यांनी मानले.

माऊली महाविद्यालयात 'कौटुंबिक हिंसाचार कायदेविषयक जागृती' कार्यक्रमाचे उद्घाटन करताना प्राचार्य जी.एन. चिट्टे, ॲड. नीता मंकणी आदी.

**Adv.Nita Mankini gave guidance on the 'Domestic Violence Act 2005'**

Shree Bharat Shikshan Prasark Mandal's

# Mauli Mahavidyalaya Wadala

## **Internal Complaint Committee**

## **Personality Development Programme Report**

Academic Year – 2019-20

Date 25/09/2019

महाविद्यालयातील अंतर्गत तक्रार निवारन समितीच्या (ICC) वतीने दिं 25.09.2019 रोजी सकाळी 10:30 वाजता खोली कं 07 मध्ये सौंदर्यतज्ञ मा.शिंगाडे प्रमिला हरिभाऊ, साईश्वरी ब्यूटी पार्लर ॲंड ट्रेनिंग सेंटर नवी पेठ सोलापूर यांचे व्यक्तीमहत्व विकास या विषयावर व्याख्यान घेण्यात आले. या वेळेस माऊली महिला पंतसंस्थेच्या अध्यक्षा डॉ.वैशालीताई साठे तसेच अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.एन.चिट्टे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक या समितीच्या समन्वयक डॉ.बिरादार पी. आर. यांनी केले. पाहूण्याचा परिचय प्रा.प्रज्ञा वाडकर यांनी करुन दिला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रा.वाघचवरे बी.डी. यांनी मानले व सूत्रसंचालन प्रा.पाटील प्रमोद यांनी केले.











**Personality Development Programme**

Shree Bharat Shikshan Prasark Mandal's

# Mauli Mahavidyalaya Wadala

## Department Of Sociology & Internal Complaint Committee

## Yuvati Melava Programme Report

Academic Year – 2019-20

Date 03/01/2020

महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग व अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त दि 03.01.2020 रोजी महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये युवती मेळावा घेण्यात आला. तालूका पोलीस स्टेशन सोलापूरच्या साहायक पोलिस निरिक्षक मा.माधुरी बाळासाहेब तावरे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. या प्रंसगी प्रमुख पाहूणे म्हणून सोलापूरच्या स्त्री रोग तज्ञ डॉ.शिला पटवर्धन त्याचप्रमाणे संस्थेचे चेअरमन मा.जितेद्र बाबा साठे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.एन.चिट्टे महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील त्याप्रमाणे न्यू हायस्कूल जुनियर कॉलेजचे प्राध्यापक, प्राध्यापीका व विद्यार्थीनी उपस्थित होते. पोलिस निरिक्षक मा. माधुरी बाळासाहेब तावरे यांनी 'स्वसंरक्षण व मुलीसमोरिल अव्हाने' या विषयावर तर स्त्री रोग तज्ञ डॉ. शिला पटवर्धन यांनी 'संस्कार ही काळाची गरज' या विषयावर विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. दुस—या सत्रामध्ये युवतीच्या कला गुणांणा वाव मिळावा म्हणून मंनोरजनाचे कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये काव्यवाचन,एकपात्री अभिनय,फॅशन शो, नृत्य इत्यादी कार्यक्रमामध्ये विद्यार्थीनींनी सक्रिय सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.बिरादार पी.आर. यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.प्रज्ञा वाडकर यांनी केले. तर अभार प्रा.अलगुंडे मॅडम यांनी मानले.





# नव्या पिढीला शिक्षणाबरोबर संस्काराचीही गरज-डॉ.पटवर्धन

**वडाळा / प्रतिनिधी**

भारतीय संस्कृती ही जगाच्या पाठीवर आदर्श संस्कृती म्हणून नावलौकिक प्राप्त ठरलेली आहे. मात्र, आपल्याकडील आजच्या नव्या पिढीला पाश्चिमात्य संस्कृतीचे अनुकरून करण्याचा ओढा वाढलेला आहे. भविष्याच्या दृष्टीने हे घातक ठरणार आहे. आजच्या नव्या पिढीला उच्च शिक्षणाबरोबर संस्काराचीही गरज आहे, असे स्पष्ट प्रतिपादन डॉ. शीला पटवर्धन यांनी केले.



सावित्रीबाई फुले जयंती निम्मित आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात शपथ घेताना डॉ. शीला पटवर्धन. शेजारी प्राचार्य डॉ.जी.एन. चिट्टे, सहाय्यक पोलीस निरीक्षक माधुरी तावरे-बोत्रे, प्रा. प्रज्ञा वाडकर आदी.

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले जयंतीनिमित्त उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा येथील माऊली महाविद्यालयात आयोजित केलेल्या युवती मेळाव्यात बोलताना त्या पुढे म्हणाल्या, सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या कार्यामुळे, त्यागामुळेच आजची भारतातील स्त्री जगाच्या पाठीवर सर्व क्षेत्रामध्ये अग्रेसर आहे. सावित्रीबाई फुले या सर्व स्त्रियांच्या जनक आहेत.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जी.एन. चिट्टे हे होते. यावेळी श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जितेंद्र साठे, सहाय्यक पोलीस निरीक्षक माधुरी तावरे-बोत्रे, प्रा. डॉ.पी.आर. बिरादार यांची प्रमुख उपस्थिती होती. सुत्रसंचालन प्रा.प्रज्ञा वाडकर यांनी केले. दरम्यान, इंटरनेट व सोशल मिडीयाचा दुरूपयोग न करण्याबाबत सर्व विद्यार्थीनींना व शिक्षकांना डॉ. शीला पटवर्धन यांनी शपथ दिली.











**वडाळा (ता. उत्तर सोलापूर) : येथील माऊली महाविद्यालयात झालेल्या युवती मेळाव्यात मार्गदर्शन करताना डॉ. शीला पटवर्धन. या वेळी प्राचार्य डॉ. जी. एन. चिट्टे, सहायक पोलिस निरीक्षक माधुरी तावरे-बोत्रे, संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र साठे आदी.**

## माऊली महाविद्यालयात झाला युवती मेळावा

**वडाळा** : वडाळा (ता. उत्तर सोलापूर) येथील माऊली महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त समाजशास्त्र विभाग अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या वतीने युवती मेळाव्याचे आयोजन केले होते. यावेळी प्रमुख्य पाहुण्या म्हणून सोलापूर येथील स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. शीला पटवर्धन उपस्थित होत्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. एन. चिट्टे अध्यक्षस्थानी होते. या वेळी श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जितेंद्र साठे, सोलापूर तालुका पोलिस ठाणे येथील सहायक पोलिस निरीक्षक माधुरी तावरे-बोत्रे, प्रा. डॉ. पी. आर. बिरादार उपस्थित होते. प्रा. डॉ. बिरादार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. प्रज्ञा वाडकर यांनी सूत्रसंचालन केले. इंटरनेट व सोशल मीडियाचा दुरुपयोग न करण्याबाबत सर्व विद्यार्थिनींना व शिक्षकांना डॉ. पटवर्धन यांनी शपथ दिली.





**Yuvati Melava – 2019-20**